बुधवार, दि ९ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४३ वा ● किमंत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# राजन काबरा सीए परीक्षेत भारतात प्रथम

## टेंभुर्णीच्या शिरपेचात मानाचा तुरा, सीएच्या तिन्ही परीक्षेत भारतात पहिला येणार एकमेव विद्यार्थी; सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव

सी ए राजन काबरा चे वडील मनोज राधेश्याम काबरा यांनी जाफ्राबाद तालुक्यातून पहिले सीए बनण्याचा मान पटकावला आहे.त्यानंतर ते छत्रपती संभाजी नगर येथे स्थायिक झाले आहे.वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून सीए बनण्याचा मानस बालपणापासून मनी बाळगलेल्या राजनने मिळवलेल्या या मोठ्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जिद्द,चिकाटी व मेहनत करण्याची तयारी असेल तर कोणतेही यश तुमच्या पासून दूर नाही.मी सीएची अवघड समजली जाणारी ही परीक्षा या त्रीसूत्रीच्या जोरावर सहज सोपी केली.ध्येय निश्चित करून नियोजन पूर्वक अभ्यास केल्यास यश हमखास मिळते. विशेष म्हणजे सीएच्या या परीक्षेसाठी कुठलेही क्लास न लावता मी स्वतः सेल्फ स्टडी करून हे यश मिळवले आहे. या यशात माझे वडील मनोज काबरा व आई सुवर्णा काबरा यांचे मार्गदर्शन व आजोबांची प्रेरणा महत्त्वपूर्ण ठरली. **- राजन काबरा**

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** नुकतेच देशात सी ए चे निकाल जाहीर झाले. देशात सर्वात अवघड असलेल्या या परीक्षेत टेंभुर्णी येथील भूमिपुत्र असलेले व तालुक्यातील पहिले सी ए असलेले मनोज काबरा यांच्या मुलाने यश गवसून आभाळ ठेंगणे केले.सी ए म्हणजे चार्टर अकाउंटं होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थी यांना महत्वाच्या तीन परीक्षा मधून जावे लागते. पाहिले फाउंडेशन हा दोन वर्षाच्या कोर्स असून त्यानंतर इंटर ही एक वर्षीय कोर्स आणि दोन वर्षाचा फायनल चा असा एकूण कोर्स असून या साठी विद्यार्थी यांच्या अक्षरशः कस लागून जातो.

या तिन्ही फॉरमॅट मध्ये राजन मनोज काबरा यांनी सगळ्या परीक्षा मध्ये भारतात सलग पहिला येऊन एक नवीन इतिहास घडविला असून त्यांच्या या सुवर्ण यशा बद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक आणि अभिनंदन होत आहे. असे यश संपादन करणारे राजन काबरा हे देशातील आता पर्यंतचे पहिलेच असा कारनामा कोणीच केला नाही म्हणून हे यश खुप मोठं आहे.



सहा तारखेला आषाढी एकादशीच्या दिवशी रविवारी जाहीर करण्यात आलेल्या या परीक्षेच्या अंतिम निकालात राजन काबरा याने ६०० पैकी ५१६ गुण घेत संपूर्ण देशातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. त्याने ही परीक्षा मुंबई येथून दिली होती. तत्पूर्वी सीए फाउंडेशन व प्रथम वर्ष परीक्षेतही राजन संपूर्ण देशातून प्रथम आला आहे.अशाप्रकारे अतिशय कठीण अभ्यासक्रम समजल्या जाणाऱ्या सीए परीक्षेच्या फाउंडेशन सह दोन्ही वर्षाच्या परीक्षेत संपूर्ण देशातून सर्वप्रथम येण्याचा एक आगळावेगळा विक्रम राजन यांने केला आहे.राजन ने सीए परीक्षेत मिळवलेल्या या नेत्रदिपक यशाबद्दल माहिती मिळताच रविवारी संपूर्ण दिवसभर त्यांच्या टेंभुर्णी येथील घरी मित्र आप्तेष्ट व गावकऱ्यांकडून अभिनंदनचा वर्षाव करण्यात आला. त्यांच्या घरी असलेले त्यांचे ९० वर्षीय आजोबा राधेश्याम काबरा व काका धीरज काबरा यांना भेटून अनेकांनी अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या.या मध्ये मानव सेवा मंडळाचे प्रांत सचिव शेख नसीम सर स्थानिक अध्यक्ष संजय राऊत पान ३ वर

## युवा आदर्श स्टोरी...

अन् टोल्ड स्टोरीवर
मुव्हीचे वाढते पीक
सिनेमा येण्या आधी
चर्चा चालते अधिक
विरोधक रे टपलेले
करत राहे टिकटिक
बंदी आणा तात्काळ
करु लागे झीकझीक
आंदोलकाशी निर्मिते
करन बसे सोयरीक
हल्ला तितका गल्ला
तिजोरी भरे उदयीक
मोर्चा धरणे उपोषण
फेकी टिका मौक्तीक
जाहिरातबाजी विना
वाढे सिनेमा लौकीक
स्वताला समजे कसे
संस्कृती रक्षक सैनिक
विवादात घाला तेला
काम विचीत्र दैनिक
पिक्चर करायचे हीट
तंत्र नवीन आधुनिक
पैका कमावू बक्कळ
मजेत करा पिकनिक

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# परतूर नगरपरिषद जाणुनबुजून शहरातील समस्यांकडे दुर्लक्ष करीत आहे का ?

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील वार्ड नंबर १२, सहयोग नगर येथे गेल्या दीड महिन्यापासून भूमीगत गटारीच्या चेंबर मधुन



घान पाणी रस्त्यावर येत आहे व घरातील पाणी चेंबर मध्ये सोडण्यात आले तेच पाणी परत घरात वापस जात असल्याने वार्डातील लोकांना त्रास सहन करावा लागत आहे. नगरपरिषद चे स्वच्छता विभागातील अधिकारी पाजगे यांना चेंबर ची समस्या सांगितली असता त्यांनी उत्तर दिले मी सुट्टी घेतली आहे तुम्ही आमचे सहकारी घुले यांना भेटा गटारीचे काम घुले कडे आहे. घुले म्हणतात ते काम पाजगे कडे आहे.असेच उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.समस्या कोणाकडे मांडाव्यात हा प्रश्न नागरिकांना पडला.कर्मचाऱ्यांना वारंवार सांगून निवेदन देऊन सुद्धा याकडे यांचेलक्ष का नाही. म्हणून पान ३ वर

# कौस्तुभ राठी व पार्थ बाहेतीचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** येथील जेष्ठ रामनारायण राठी यांचे नातू कौस्तुभ मनिष राठी यांनी चार्टर अकाउंटं (सी ए)च्या परीक्षेत यश प्राप्त केले. अवघड असलेली ही परीक्षा पास केल्या बद्दल त्याचे कौतुक होत आहे. या यश प्राप्ती बद्दल त्यांचे सत्कार करून त्याला शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच पान ३ वर

# जाफ्राबाद मधील सह्याद्री पार्कची दुरावस्था

## नगरपंचायतीकडे रस्ता दुरुस्तीची मागणी



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** शहरात असलेल्या सह्याद्री पार्क मधील रस्त्यांची दुरावस्था पावसामुळे समोर आली आहे.सततच्या पावसामुळे वाहन चालक त्रस्त झाले असून या रस्त्यांवरून पायी चालणं देखील अवघड झालं आहे.शाळेत जाताना अनेक विद्यार्थी पायी चालताना देखील पाय घसरून पडत असल्यानं विद्यार्थ्यांच्या हाता पायाला मार लागत असल्यानं विद्यार्थी हतबल झालेत.तात्काळ या भागातील रस्ते दुरूस्त करावेत अशी मागणी सह्याद्री पार्क मध्ये राहणाऱ्या नागरीकांनी नगर पंचायतच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. चिखलमय रस्ता झाल्यानं दुचाकी स्लिप होऊन अपघात होत असल्यानं दुचाकी चालक मेटाकुटीला आले आहेत.त्यामुळे या भागातील रस्ते दुरुस्ती करून आम्हाला न्याय द्यावा अशी मागणी कौतीक पंडित यांच्यासह नागरीकांनी निवेदनाद्वारे केली आहे.

# संपादकीय

## कलात्मक दिग्दर्शक गुरुदत्त

अगदी थोड्या काळात ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटून हिंदी चित्रपट सृष्टीत आपले नाव अजरामर केले त्या हिंदी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते गुरुदत्त यांची आज जयंती. आज त्यांची १०० वी जयंती. गुरुदत्तजींच्या १०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा विशेष लेख. गुरुदत्त हिंदी चित्रपट सृष्टीत जिवंतपणीच अख्यायिका बनलेले व्यक्तिमत्व. आजही गुरुदत्त यांचे नाव घेतले की आठवतात ते त्यांचे कलात्मक चित्रपट मग ते चौदहवी का चांद असोत की कागज के फूल, सी आय डी असोत की मी. अँड मिसेस ५५ आरपार असोत की प्यासा. त्यांच्या प्रत्येक चित्रपटात आणि चित्रपटातील प्रत्येक दृश्यात कलात्मकता दिसून येते. चित्रपट कलात्मक असूनही त्यांच्या चित्रपटांना प्रेक्षकांची पहिली पसंती मिळत असे म्हणूनच त्यांना कलात्मकता आणि व्यावसायिकता यांच्यात सुवर्णमध्य साधणारा संवेदनशील निर्माता दिग्दर्शक म्हंटले जाते. वर उल्लेख केलेले सर्व चित्रपट हिंदी चित्रपट सृष्टीतील माईल स्टोन चित्रपट आहेत. आजही फिल्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट मध्ये शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना हे चित्रपट आवर्जून दाखवले जातात. त्यांच्या प्रत्येक चित्रपटाला समीक्षकांची तर पसंती मिळालीच पण प्रेक्षकांनी ही चित्रपट डोक्यावर घेतले. साहिब बिबी और गुलाम या चित्रपटाला तर राष्ट्रपतींचे सुवर्णपदक मिळाले. या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय झाली. आजही ती तितकीच लोकप्रिय आहेत मग ती बाजी चित्रपटातील आज की रात पिया दिल ना तोडो... जाल मधील ये रात ये चांदणी फिर कहा.... आरपार मधील बाबूजी धीरे चलना..... सी आय डी मधील तर सर्वच गाणी लोकप्रिय झालीत मग ती आँखो ही आँखो मे इशारा हो गया... लेके पहला पहला प्यार... ये दिल है मुश्कील जिना यहा... मी अँड मिसेस ५५ मधील थंडी हवाये काली घटाये.... प्यासा मधील जाने वो कैसे लोग थे... कागज के फूल मधील वक्त ने किया क्या हसी सितम... चौदहवी का चांद मधील चौदहवी का चांद हो या आफताब हो.. साहिब बिबी और गुलाम मधील ना जाओ सय्या छुडाके बैया..... त्यांच्या चित्रपटातील सर्व गाणी सुमधुर होती म्हणूनच ती गाणी लोकप्रिय ठरली. केवळ गाणीच नाही तर त्यांच्या चित्रपटातील संवादही लोकप्रिय झाले. गुरुदत्त यांच्यावर बंगाली साहित्य आणि विचारांचा मोठा प्रभाव होता हाच प्रभाव त्यांच्या चित्रपटातूनही दिसून येतो. ९ जुलै १९२५ रोजी बंगलोर येथे त्यांचा जन्म झाला त्यांचे खरे नाव वसंत शिवकुमार पदुकोण असे होते. जन्म जरी बंगलोर येथे झाला तरी त्यांचे बालपण पश्चिम बंगालमधील भवानीपूर येथे गेले. आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांनी मॅट्रिक पर्यंतच शिक्षण घेतले. नंतर ते पुण्यात आले. तिथे प्रसिद्ध फिल्म कंपनी प्रभात मध्ये त्यांना असिस्टंट दिग्दर्शक व नृत्य दिग्दर्शक म्हणून नोकरी मिळाली. तिथेच त्यांची ओळख देव आनंद यांच्यासोबत झाली ओळखीचे रूपांतर मैत्रीत झाले आणि पुढे ही मैत्री इतकी घट्ट झाली की दोघांनीही एकमेकांना आपल्या चित्रपटात संधी दिली. देव आनंद यांच्या बाजी आणि जाल या चित्रपटाचे दिग्दर्शन गुरुदत्त यांनी केले तर गुरुदत्त यांनी निर्माण केलेल्या सी आय डी या चित्रपटात देव आनंद हे नायक होते. गुरुदत्त हे एक महान चित्रपट कर्मी होते त्यासोबतच ते एक माणूस ही होते. इतर माणसांप्रमाणे त्यांच्यातही गुणदोष होते. बाजी या चित्रपटाच्या सेटवर गुरुदत्त यांची गीता रॉय या बंगाली अभिनेत्रीशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. त्यांना तीन मुलेही झाली पण दोघांचे एकमेकांशी पटले नाही दोघात किरकोळ कारणांमुळे वाद होऊ लागला. दररोज होणारा वाद टाळण्यासाठी गीता रॉय मुलांना घेऊन घराबाहेर पडल्या, वेगळ्या राहू लागल्या याच दरम्यान गुरुदत्त हे वहिदा रहेमान यांच्या जवळ गेल्याचे बोलले गेले मात्र वहिदाजींना आपले करियर करायचे असल्याने त्या या नात्यात अडकल्या नाहीत. या सर्व कारणांनी गुरुदत्त कमालीच्या डिप्रेशनमध्ये गेले आणि तो काळा दिवस उजाडला. ९ ऑक्टोबर १९६४ रोजी पत्नी गीता रॉय मुलांसह त्यांना भेटायला येणार होत्या मात्र त्या आल्या नाहीत त्यामुळे चिडलेल्या गुरुदत्त यांनी रागाचा भरात झोपेच्या गोळ्या खाल्लया. त्यांना हॉस्पिटलमध्ये ऍडमिट करण्यात आले पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑक्टोबर १९६४ रोजी त्यांची प्राणज्योत माळवली. अवघ्या ३९ वर्षाचे आयुष्य त्यांना लाभले. त्यांच्या निधनानंतर प्रख्यात शायर कैफी आझमी यांनी लिहिलंय

**रहनेको सदा दहरमे आता नही कोई**
**तुम जैसे गये वैसे जाता नहीं कोई**
**एक बार तो मौत भी घबरा गई होगी**
**यू मौत को सिने से लगाता नहीं कोई**

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## पक्ष-विपक्ष व ठाकरे बंधूंनी भाषेचे राजकारण न करता; मराठी भाषेला प्रथम प्राधान्य देवून ज्वलंत व गंभीर प्रश्नाकडे वळावे!

सध्याच्या परिस्थितीत राजकीय पुढारी मराठी भाषेला प्राधान्य कमी व राजकारणाला जास्त महत्त्व देत असल्याचे राजकीय वर्तुळात दिसून येते.कारण ज्याला जसे वाटेल तसे राजकीय पुढारी वक्तव्य करतांना स्पष्ट दिसत आहे.यामुळे आपल्याला राजकारणात जास्तीत जास्त फायदा कसा होईल याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. सरकारने अचानक हिंदी सक्तीचा जीआर काढला तेव्हा पासून राज्यात भाषावादाला एक नवीन वळण आल्याचे दिसून आले. सरकारच्या हिंदी सक्तीच्या नादात राज ठाकरे भाजपा पासुन दुरावले व उध्दव ठाकरे यांच्या गोटात जाऊन मिळाले याला कारणीभूत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शिक्षण मंत्री भुरे आहेत.आज मराठी-हिंदी भाषा वाद एवढा विकोपाला गेला की शेअर मार्केटमधील केडियोनॉमिक्स कंपनीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील केडिया यांनी ट्युटमध्ये म्हटले होते की राज ठाकरे हे लक्षात ठेवा, मी गेल्या ३० वर्षापासून मुंबईत राहत असूनही मला मराठी नीट येत नाही.आता तुमच्या वाईट वागणूकीमुळे मी असा निश्चय केला आहे की मी मराठी शिकणार नाही.मी अशी प्रतिज्ञा करतो.क्या करना है बोल? असे बोलून केडिया ने मराठी भाषेत एक नवीन वाद निर्माण केला व नंतर अंगलट आल्याचे पाहून राज ठाकरेंना माफी सुध्दा मागितली.म्हणजेच ज्या ताटात खायच,त्याच ताटाला छिद्र पाडायचे असे काम केडियाने केले आहे आणि याला कारणीभूत सरकारने काढलेला हिंदी भाषेचा सक्तीचा जीआर आहे.तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी हिंदी सक्तीला नवीन वळण दिले असून गुजरात प्रेम वाढल्याचे दिसून आले. पुण्यातील एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी जय हिंद,जय महाराष्ट्र सोबतच जय गुजरातचाही नारा दिला. कारण त्या कार्यक्रमात अमित शाह उपस्थित होते. यावरून स्पष्ट लक्षात येते मराठी भाषेला विसरून एकनाथराव शिंदे अमित शाह पुढे लोटांगण जात आहे की काय असे वाटत आहे.कार्यक्रम महाराष्ट्रात आणि गुजरातचा जय जय कार ही बाब सरकार कशी काय सहन करीत आहे?हा मोठा प्रश्न उपस्थित होतो.कारण एकनाथराव शिंदे एका जबाबदार पदावर विराजमान आहेत.यावरून स्पष्ट होते की राज्यातील काही लोक मुद्दाम मराठी भाषेला डावलून हिंदी भाषेची सक्ती करण्याचा प्रयत्न करीत असुन याचा फायदा येणाऱ्या निवडणुकीत कसा घेता येईल याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष आहे.शिंदे असेही म्हणायचे की शिवसेना मराठी माणसासाठी उभी केली परंतु आता जय गुजरातच्या नाऱ्यामुळे शिंदेंची मती मारल्या गेली की काय असे वाटते आहे यालाच म्हणतात विनाशकाले विपरीत बुद्धी.सरकारने व पक्ष-विपक्षांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की भाषेवरून राज्यात कोणत्याही प्रकारची गुंडगिरी व राजकारण नकोच! सर्वांनीच राजकारण बाजूला सारून मराठी भाषेला कसे उंच शिखरावर नेता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे.कारण राज्यातील प्रत्येक माणूस मातृभाषेपासून परीपक्व होतो व संपूर्ण विषयांची समज पक्की होते.यामुळे प्रत्येकामध्ये संस्कार,आदानप्रदान, सुसंस्कृतपणा, संस्कृती,जडणघडण, आचारविचार या संपूर्ण बाबी परीपक्व करण्याचे काम संपुर्ण मातृभाषा करीत असते. त्रिभाषा धोरणाची अंमलबजावणी करण्यासंदर्भात दिनांक १६ एप्रिल २०२५ आणि १७ जून २०२५ रोजी काढण्यात आलेले दोन्ही शासन निर्णय दिनांक २९ जूलै २०२५ ला रद्द करण्यात आले.यामुळे भाषा विवाद सध्याच्या परिस्थितीत निवळल्याचे दिसून आले होते. परंतु आता सर्वच राजकीय पक्षांनी भाषेला आपले राजकीय अस्त्र-शस्त्र बनविण्याचे दिसून येते.प्रथम हिंदीचा जीआर काढणे आणि नंतर सारवासारव करण्यासाठी जीआर रद्द करणे ही तर हेतूपुरस्सर राजकीय खेळी म्हणावी लागेल. कारण सरकारच्या या धोरणामागे एकच उद्देश असावा तो म्हणजे हिंदी भाषीक परप्रांतीयांना राज्यात उद्योग धंद्यामध्ये चालना मिळावी.आज राज्याच्या प्रत्येक मुलांना वयाच्या दहा वर्षांपर्यंत मातृभाषेचे संपूर्ण ज्ञान अवगत असायलाच हवे तेंव्हाच मातृभाषा परीपक्व होईल.जर हिंदी पहिल्या वर्गापासून लादली तर मातृभाषेवर याचा विपरीत परिणाम अवश्य होईल. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे.ज्यावेळेस मुले पहिलीपासून मराठी लिहायला, वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही आपोआप लिहिता वाचता येते ही बाब सरकारने व पक्ष-विपक्षांनी आणि ठाकरे बंधूंनी लक्षात ठेवली पाहिजे.आता जीआर रद्द झाल्यानंतर समिती गठीत करण्याची काहीच आवश्यकता नव्हती.कारण महाराष्ट्रातील प्रत्येक मराठी माणुस पहिली पासून हिंदी किंवा इतर भाषा स्विकारणार नाहीच त्यामुळे सरकारने स्थापन केलेली डॉ.नरेंद्र जाधव समिती स्थापन करून त्यांच्या अहवालाची काहीही गरज नाही.कारण हा अहवाल मराठी माणुस स्विकारणार नाहीच.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत जे शैक्षणिक धोरण आहे तेच अमलात राहु द्यावेत यात कोणत्याही प्रकारची तडजोड किंवा बदल करूच नये. सरकार,पक्ष-विपक्ष व ठाकरे बंधू यांनी भाषा वादाला ताबडतोब पुर्णविराम लावावा व पुर्वी ज्या पद्धतीने भाषेचे समिकरण होते त्याच पद्धतीने पुढे सुरू ठेवावेत.सध्या पावसाळा सुरू आहे व पावसाने संपूर्ण महाराष्ट्रात रौद्र रूप धारण केले आहे यामुळे शेतकरी,गरीब व सर्वसामान्य अडचणीत सापडला असून कठीण परिस्थितीत आहे.अशा प्रसंगी ज्वलंत व मुलभूत प्रश्नावर सरकार,पक्ष-विपक्ष व ठाकरे बंधूंनी जातीने लक्ष देण्याची गरज आहे. कारण मराठी माणसाला मराठी भाषेवर प्रेम आहे. जय महाराष्ट्र!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## युती; राज तळ्यात मळ्यात तर उद्धव ठाकरे आतूर

हिंदी सक्ती आणि त्रिभाषा सूत्र लागू करण्याचे दोन शासकीय आदेश रद्द करण्यात आले.मराठीचा आवाज बुलंद झाला.फडणवीस हे वातावरण पाहून दोन पाऊले मागे आले असले तरी भविष्यात हिंदी सक्ती लादणारच यात शंका नाही.मराठी माणूस मुंबईसह महाराष्ट्रात चांगल्या स्थितीत नाही हि वस्तुस्थिती आहे. राज्यातील स्थानिक राजकीय पक्ष टिकून राहणे हि लोकशाहीची गरज आहे.दोन भाऊ समस्त मराठी माणूस आणि महाराष्ट्रप्रेमी यांच्या प्रेमळ हक्काच्या दबावाचे स्वागत करून एकत्र आले हे स्वागतार्ह आहे.१०६ हुतात्मे सुखावले असतील.मराठी जनतेच्या अपेक्षांची पूर्तता झाली अनेकांचे डोळे पाणावले. सर्वांच्या मनात एकच विचार आला कि आज बाळासाहेब हवे होते. भाजपने महाराष्ट्राचे आर्थिक,सामाजिक शैक्षणिक लचके तोडले.पक्ष फोडले त्याला मराठी माणूसच बळी पडला हे दुर्दैवच म्हणावे लागेल. दोघांहि भावांचे वैचारिक मार्ग भिन्न असले तरी मराठी माणूस आणि महाराष्ट्र ह्यासाठी एकजूट हाच उपाय आहे. राज आणि उद्धव ठाकरे यांनी फडणवीस ह्यांचे आभार मानणे हा त्यांना खिजवण्याचाच प्रकार आहे.त्या उत्स्फूर्त मराठी मेळाव्याला रुदाली म्हणून



फडणवीसांनी खिल्ली उडवणे हे जशास तसे उत्तर असले तरी त्यांच्या राजकीय कोतेपणचे लक्षण आहे.ठाकरे बंधूंचे एकत्र व्यासपीठावर येणे पाहून सर्व मराठी चॅनेल्सनी सुद्धा टाळ्या वाजवून आनंद साजरा केला हा दाबून ठेवलेल्या मराठी भाषेचा विजय आहे.राज ठाकरे यांनी युती संदर्भात सावध भूमिका घेतली असली तरी उद्धव ठाकरे यांनी एकत्रच राहणार असे सांगून शिवसेनेची भूमिका स्पष्ट करून राज ठाकरे यांची वैचारिक कोंडी केली. डळमळीत झालेल्या शिवसेनेला उभारी घ्यायची असेल व मराठी मतांचा फटका बसू नये ह्यासाठी केलेली राजकीय खेळी आहे आणि ते पक्षहितासाठी गरजेच आहे. राज यांनी भाजप किव्वा शिंदे सोबत हातमिळवणी केलीत तर पक्ष संपल्यात जमा आहे.शिवसेनेसोबत आलात तर राजकीय अस्तित्व टिकेल आणि वाढेल सुद्धा हा त्यामागचा इशारा आहे.महाराष्ट्राचे कलंकित झालेले वैभव पुन्हा तेजाने उजळायचे असेल तर दोन्ही भावांनी युती जाहीर करावी.शिवसेनेचे दबावाने वाट चुकलेले नेते व अन्य पक्षात असलेल्या मराठी जनतेने आपले अस्तित्व टिकवलेच पाहिजे. महाराष्ट्राच्या हितासाठी ठाकरे बंधूंच्या पाठीशी सर्व शक्तीनिशी उभे राहणे हि मराठी आणि महाराष्ट्रासाठी काळाची गरज आहे.कारण दगडा पेक्षा वीट मऊ.

**यशवंत चव्हाण सीबीडी**
**बेलापूर (नवी मुंबई )**
**मो.९९२०७७६२७७**

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# जालना जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व प्रभावीपणे राबविण्याचा आपला मानस - मुख्य कार्यकारी अधिकारी

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** जालना जिल्ह्यातील शिक्षण व्यवस्था अधिक सक्षम व प्रभावीपणे राबविण्याचा आपला मानस असल्याचे प्रतिपादन जालना जिल्हा परिषदेच्या नवनियुक्त मुख्य कार्य अधिकारी पी.एम मिनू यांनी गुरुवारी ता.३ केले.महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ,जालना च्या वतीने नुतन मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मिनू मॅडम तसेच शिक्षणाधिकारी श्रीमती.संगीता भागवत मॅडम यांचे स्वागत करण्यात आले.यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मॅडम यांनी जवळपास अर्धा तास वेळ देऊन सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. पदोन्नती बद्दल संघाने केलेल्या मागणीबद्दल सकारात्मकता दर्शवली. याविषयी शिक्षण विभागाकडून सविस्तर माहिती घेऊन पदोन्नतीसह इतर प्रश्न तात्काळ सोडवले जातील असे त्या म्हणाल्या. त्यासोबतच शिक्षणाधिकारी श्रीमती.संगीता भागवत यांचे सुद्धा संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले.शिक्षकांच्या पदोन्नतीसह वेतन व विविध प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील यासाठी थोडा अवधी लागेल असे त्या म्हणाल्या. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा कमी होणारा पट ही देखील चिंतेची बाब असून यासाठी देखील शिक्षक संघटनासह शिक्षण विभागाने सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या. यासोबतच प्रशासन आणि शिक्षक संघटना आणि सर्व शिक्षक यांच्या मदतीने आपला जिल्हा गुणवत्तेमध्ये अग्रेसर करण्याबाबत आवाहन केले.याप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक महासंघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष संघाचे उत्तमराव वायाळ,जिल्हाध्यक्ष भगवान भालके,सरचिटणीस शांतीलाल गोरे,पाराशर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन संतोषराव इंगळे, कार्याध्यक्ष उद्धव खांडेभराड,वसंता शेवाळे,बिजू वाघमरे,विलास खैरे,जाफराबाद शिक्षक पतसंस्थेचे माजी चेअरमन विनोद कळंबे, गजानन मैंद, हरी भोसले,क्रीडा प्रबोधनी चे संचालक प्रमोद खरात,महिला प्रतिनिधी श्रीमती.मीनाक्षी ताई पांगारकर,श्रीमती.रुख्मिणी ताई कुंटे जाफराबाद तालुकाध्यक्ष दीपक चव्हाण,भोकरदन तालुकाध्यक्ष सुनिल गिरणारे,अनंता जंजाळ,बदनापूर तालुकाध्यक्ष राजेश लामगे,अंबड तालुकाध्यक्ष सोपान पाष्टे,जालना तालुकाध्यक्ष अरुण कदम, भोकरदन



कार्याध्यक्ष राजु निहाळ, उपाध्यक्ष राहुल ढोक,मनोज कणखर, प्रकाश मांनसुरे,जिल्हा पदाधिकारी सर्वश्री पुंजाराम रायमल ,पंडित गायके , किशोर महाजन,कल्याण गव्हाणे,चंद्रशेखर म`टकर,कैलास धोत्रे,उमेश पडोळ,भरत जाधव,जंगले सर,पांडुरंग बडे,सखाराम दांडगे यांची उपस्थिती होती.

# सेवाभावाची ज्योत पुढील पिढीने तेवत ठेवली तरच डॉक्टरांचे देवत्व अबाधित राहील-डॉ. प्रधान

**जालना । प्रतिनिधी -** वैद्यकीय क्षेत्र कॉर्पोरेट संस्कृतीच्या दिशेने झुकत असून, आगामी दशकात कॉर्पोरेट हॉस्पिटल्सचा प्रभाव वाढत जाईल आणि नफा कमावणे हा उद्देश राहील. एआय, रोबोटिक सर्जरी यांसारख्या तंत्रज्ञानामुळे काही प्रमाणात डॉक्टरांची गरज कमी होईल, विशेषतः पॅथॉलॉजी क्षेत्रात मोठा परिणाम दिसेल. पुढील पिढीकडे प्रचंड पैसा, साधने आणि तंत्रज्ञान असेल. त्यामुळे आजचे सरासरी आयुर्मान ८०- ८५ वर्षांवरून १०० ते १२० पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत आज जी सेवा भावना डॉक्टरांमध्ये आहे, ती पुढच्या पिढीपर्यंत पोचवली गेली तरच डॉक्टरांचे देवत्व अबाधित राहील, असे प्रतिपादन माजी प्रांतपाल तथा रोटरीचा सर्वोच्च अबाऊ सर्विस सेल्फ अवार्ड प्राप्त डॉ. राजीव प्रधान यांनी येथे बोलताना केले.

रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे रविवार दि. ६ जुलै रोजी डॉक्टर डे निमित्त शहरातील सर्व क्षेत्रातील डॉक्टर्सचा सन्मान करण्यात आला, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी वैद्यकीय क्षेत्रातील बदलत्या वास्तवावर सखोल विचार मांडले. व्यासपीठावर क्लबच्या अध्यक्ष वर्षा पित्ती, सचिव लक्ष्मीनिवास मल्लावत, प्रकल्पप्रमुख डॉ. चारुस्मिता हवालदार आणि डॉ. विजय जेथलिया यांची उपस्थिती होती.

डॉ. प्रधान पुढे म्हणाले की, डॉक्टर जेवढ्या निष्ठेने व समर्पणाने सेवा देतात, तेवढी सेवा कोणताच समाज घटक देत नाही. ते रात्रंदिवस रुग्णसेवेत झिजतात, त्यामुळे त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. पूर्वीच्या आणि आजच्या डॉक्टरांच्या पिढीमध्ये मोठं अंतर निर्माण झालं आहे. शिक्षणाचा कालावधी वाढला आहे. परीक्षा पद्धती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. केवळ पीजी करून भागत नाही; आता सुपर स्पेशालायझेशन करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे वय वाढत जातं आणि करिअर उशिरा सुरू होतं. या बदलामुळे डॉक्टरांची कार्यपद्धतीही बदलते आहे, असे ते म्हणाले. डॉ. प्रधान यांनी सामाजिक समतेच्या मुद्द्यावर भर देत सांगितले की, भारत वगळता जगातील बहुतांश देशांमध्ये स्त्री-पुरुष भेदभाव जवळजवळ नाही. मात्र, भारतात केवळ ८ ते १० टक्के महिला नोकरी करतात. जर हे प्रमाण २५ टक्क्यांवर गेले, तर देशाच्या जीडीपीत १ टक्का वाढ होऊ शकते. महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या अर्थकारणातील सहभागाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

प्रसंगी उपस्थित सर्व डॉक्टरांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## रोटरी क्लब राबविणार 'स्त्री जन्माचे स्वागत' अभियान

रोटरी क्लबच्यावतीने 'स्त्री जन्माचे स्वागत' हे विशेष अभियान राबविले जाणार असून, मुलीचा जन्म झाल्यास मातेला गिफ्ट हॅम्पर देऊन सन्मान करण्यात येणार आहे. गिफ्ट हॅम्परमध्ये झबले, शतावरी , सागवान चे २ रोपटे, ड्रायफ्रूट पॉकेट राहणार आहेत. सागवान चे एक झाड २० वर्षानन्तर एक लाखाचे उत्पन्न देऊ शकते. अर्थात २ झाडे २ लाखाचे उत्पन्न देतील. म्हणजेच स्त्री जन्माच्यावेळी तिच्या मातेला तीन लाख रुपयाचे गिफ्ट देणे जेणेकरून त्या मुलीचा उच्च शिक्षणाचा खर्च निघेल,अशी ही संकल्पना आहे. या अभियान लोकार्पणाच्या अनुषंगाने उपस्थितांना मी हुंडा देणार नाही, घेणार नाही, स्त्री भ्रूणहत्या करणार नाही आणि करू देणार नाही अशी शपथ देण्यात आली.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय हेल्प लाईन

**जालना । प्रतिनिधी -** सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार, राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्था आणि राज्य सरकारच्या सहकार्याने जेष्ठ नागरिकांसाठी १४५६७ राष्ट्रीय हेल्प लाईन ही सेवा देशभरातील सर्व राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात वयोवृद्धांसाठी सुरू करण्यात आली आहे. यांच्यामार्फत ही सेवा महाराष्ट्रात राबवली जाते.मानवसेवा हीच ईश्वर सेवा हे ब्रीद वाक्य घेऊन संस्थापक अध्यक्ष डॉ. विनोद शहा (चऊ) यांच्या मार्गदर्शनाखाली ३७ वर्षापासून सातत्याने आपल्या विविध प्रकल्पाद्वारे गरीब, आजारी, वृध्य, अपंग, निराधार, गरीब मुले मुली आणि महिला यांची सेवा करीत आहेत.

ऑगस्ट २०२१ पासून सुरू झालेल्या या १४५६७ राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाइनवर आतापर्यंत ४ लाखांहून अधिक कॉल्स आले असून, ३० हजारांहून अधिक प्रकरणांमध्ये क्षेत्रीय पातळीवर प्रत्यक्ष मदत करण्यात आली आहे. हेल्पलाइनद्वारे आरोग्य, पोषण, निवारा, आश्रयगृह व वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, याबाबतची माहिती मिळते. तसेच कायदेविषयक, मालमत्ता व कौटुंबिक वादांमध्ये मोफत कायदेशीर सल्ला, पेन्शन योजना, ज्येष्ठ नागरिकांसाठी चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम २००७ आदीचे मार्गदर्शन मिळते. भावनिक आधार, मानसिकआजार व चिंता, ताण, राग इत्यादी व्यवस्थापन.

बेघर व अत्याचारग्रस्त वृद्धांसाठी मदत आणि पुनर्वसन, कुटुंबीयांशी संवाद,पोलिस प्रशासनाशी समन्वय, समुपदेशन देखील केले जाते.

'एल्डर लाईन १४५६७' ही केवळ हेल्पलाईन नाही, तर ज्येष्ठ नागरिकांसाठी एक विश्वासाचा हात, एक सुरक्षित आधार आहे. या माध्यमातून वयोवृद्धांच्या गरजा समजून घेतल्या जातात. तसेच त्यांना सन्मानाने जगता येईल यासाठी आवश्यक ती मदत केली जाते. ज्येष्ठांसाठी ही सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी समाजातील प्रत्येकाने जागरूक व्हावे आणि सर्व गरजू वयोवृद्धांनी या एल्डर लाईनचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

पान १ वरुन

## राजन काबरा ...

सचिव अलकेश सोमाणी उपाअध्यक्ष दत्तू मुनेमानिक यांनी घरी जाऊन शुभेच्छा देऊन सत्कार केला.आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सी ए परीक्षेत टेंभुर्णी येथील राजन काबरा हा संपूर्ण देशातून प्रथम आल्याबद्दल टेंभुर्णी येथील त्याचे आजोबा राधेश्याम काबरा यांचे कौतुक करताना मानव सेवा मंडळाचे पदाधिकारी. इन्सॅट मध्ये राजन काबरा. राजन मनोज काबरा भारतात पहिला. टेंभुर्णीकरान साठी अभिमानाची बाब.टेंभुर्णी येथील ज्येष्ठ व्यापारी श्री राधेश्याम काबरा यांचे चिरंजीव सी ए मनोज काबरा यांचा मुलगा राजन मनोज काबरा यांनी नुकत्याच झालेल्या देशातील सर्वात मोठ्या आणि महत्वाच्या परीक्षेत मध्ये पूर्ण भारतातून पहिल्या येण्याचा मान मिळवून त्याची परिवाराची आणि टेंभुर्णी ची मान उंचावली आहे. त्याने ६०० मार्क पैकी ५१६ मार्क प्राप्त करत हे यश संपादन केले होते. विशेष म्हणजे त्यांनी साठी या अगोदर होणाऱ्या फाउंडेशन,एंटमिडिएट मध्ये ऑल इंडिया रँक भारतात पहिला येण्याचा ही मान मिळविला आहे. त्यांच्या या यशाचे श्रेय त्यांनी आपले वडील मनोज काबरा आणि आई सुवर्णा काबरा यांना दिले.

## परतूर नगर ...

शहरातील सहयोग नगर वार्डातील एका लाईन ने दहा घरे आहेत या लोकांनी स्वतःच्या खर्चानी नाली खोदकाम सुरू केले आहे.चेंबर मध्ये सोडण्यात आलेले पाईप बंद करून नालीचा वापर केला जाईल.यासाठी आपल्या घराच्या समोरील बांधलेले वटे, पायरीचे बांधकाम पाडून नाली करण्यात येत आहे. यामुळे एका घरातील व्यक्तीला दाहा पंधरा हजार रुपये खर्च करावा लागला आहे.हाखर्च कोण देणार आहे कारण भुमीगत गटार योजना फेल झाली आहे म्हणून आम्हाला डबल खर्च करावा लागतो. या गल्लीतील लोकांनी चांगल्यापैकी बांधकाम केलेले आहे परंतु नाईलाजाने हे पाऊल उचलावे लागले आहे.म्हणुन संताप व्यक्त करताना म्हणाले आम्ही एकमत करून असा निर्णय घेतला आहे.आता नगरपरिषद निवडणुकीत आम्ही सर्व मतदानावर बहिष्कार टाकू नसता आमचा जो खर्च झाला आहे आम्हाला परत करावा. असे मत येथील लोकांनी व्यक्त केले आहे.

## कौस्तुभ राठी ...

येथील तरुण व्यापारी सतीश बाहेती यांच्या मुलाने पार्थ सतीश बाहेती यांनी सीए फाउंडेशन मध्ये यश प्राप्त केल्या बद्दल त्यांचे ही परिवार कडून सत्कार करण्यात आले. या वेळी सी ए रमेश बाहेती, रामनारायण राठी भिकुलालजी बाहेती,जलज बाहेती, सौ सीमा बाहेती, अलकेश सोमाणी,सुनील बाहेती, शिरीष राठी,अनिल बाहेती,डॉ गोपीकिशन लोहिया, सतीश बाहेती,यांनी कौस्तुभ राठी यांचे अभिनंदन केले.

# आझाद मैदानात कक्कय्या समाजाचा जनसागर लोटला; धरणे आंदोलनाला सर्वपक्षीय पाठिंबा!

**मुंबई । प्रतिनिधी -** संत कक्कय्या समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ मिळावे यासाठी आझाद मैदानात ७जुलै रोजी कक्कय्या(ढोर) समाजाचे एकदिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले होते. यावेळी आझाद मैदानात कक्कय्या (ढोर )समाजाचा म ोठा जनसागर लोटला होता.संत कक्कय्या नावाच्या टोप्या समाज बांधवानी परिधान केल्या होत्या. कोण म्हणतो देणार नाय, घेतल्या शिवाय राहणार नाय महामंडळ आमच्या हक्काचेअशा विविध घोषणानी आझाद मैदान दणाणून गेले होते.

मुंबई ठाणे, पुणे, नाशिक, जालना,औरंगाबाद, बीड, परभणी,नांदेड,मि रज,सांगली,सातारा,कोल्हापूर,सोला पूर, लातूर अशा वेग वेगळ्या जिल्हातून कक्कय्या बांधव हजारोच्या संख्यने आर्थिक विकास महामंडळ मिळावे म्हूणन आझाद मैदानात दाखल झाले होते.

वीरशैव कक्कया कल्याण मंडळ मुंबई, हि संस्था कक्कया ढोर जात अनुसूचित जाती तील एक घटक आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेला समाजाला वंचित घटकाना आर्थिक सहाय्यता मिळावी, स्वयं रोजगार साठी मदत मिळावी म्हणून संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ या नावाने स्वतंत्र शासकीय म हामंडळ निर्माण करावे या मागणीसाठी, हे मंडळ मागील चार वर्षा पासुन शासन दरबारी प्रयत्न करीत आहे.

मागील वर्षी एकदिवसीय राज्यव्यापी धरणे अंदोलन २८ जून २०२४ रोजी आझाद मैदान येथे धरणे करण्यात आले. त्यावेळी तत्कालीन आमदार ज्ञानराज चौगुले आणि इतर लोक प्रतिनिधी ह्यांच्या एकत्रित प्रयत्नामुळे, मागील वर्षी तत्कालीन मुख्यमंत्री श्री एकनाथजी शिंदे यांनी मागील वर्षी पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ देतो अशी घोषणा केली, परंतु शासन निर्णय अखेर निघाला नाही,मंडळाचे पदाधिकारी यांनी वर्षभर पाठपुरावा केला तरी काहीच उपयोग झाला नाही.४जुलै २०२५रोजी मा श्री संजयजी शिरसाट साहेब सामाजिक न्याय मंत्री यांची विधान भवन येथे प्रत्यक्ष भेट घेतली असता बैठक लावतो असे आश्वासन दिले.परंतु आज अखेर काहीच झाले नाही.समाज प्रचंड नाराज झाला असून त्यामुळेच दुसरे राज्यव्यापी धरणे अंदोलन ७ जुलै २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे करण्यात आले.

यावेळी धरणे आंदोलनाला सर्वपक्षीय नेत्यांनी उपस्थित राहून धरणे आंदोलनाला पाठींबा दिला.

यावेळी कॉंग्रेस खासदार वर्षा गायकवाड,शिवसेना माजी खासदार राहूल शेवाळे, कॉंग्रेस आमदार ज्योती गायकवाड, यशोमती ठाकूर,महाराष्ट्र कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी नगरसेवक वसंत नकाशे,धारावी विधानसभा संघटक विठ्ठल पवार यांनी आंदोलनस्थळी उपस्थित कक्कय्या सम ाजाला पाठिंबा दिला.

सरते शेवटी वीरशैव कक्कया कल्याण मंडळ मुंबई यांच्या पदाधिकाऱ्यांना विधानभवन भवनात सामाजिक मंत्री संजय शिरसाट यांनी भेट दिली आणि अधिवेशन संपेपर्यंत संत कक्कय्या समाजाला स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ देण्याची घोषणा करण्याचा प्रयत्न करतो असे आश्वासन दिले.



## २१ रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**जालना -** महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. दि. २१ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या म हिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणा-या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करण्याचे आवाहन केले आहे.

अर्ज स्वीकृतीचे निकष पुढीलप्रमाणे तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे, तक्रार निवेदन दोन प्रतित सादर करावे, सदरील प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, अर्ज विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावा, सेवा व आस्थापना विषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. निवडणुक आचार संहिता काळात त्या त्या स्तरावर, विधीमंडळ अधिवेशन काळात राज्यस्तर महिला लोकशाही दिन पाळण्यात येत नाही. महिलांनी प्रथम संबंधीत तहसिलदार यांच्याकडे महिला लोकशाही दिनाच्या पंधरा दिवस आधी दोन प्रतीत तक्रार दाखल करावी. तालुका महिला लोकशाही दिनात एका महिन्यांचे आत कार्यवाही न झाल्यास संबंधीत महिला जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिनांत तक्रार दाखल करु शकतील. तालुकास्तरावरील लोकशाही दिनांत अर्जदार महिलेस अंतिम उत्तर शक्य तितक्या लकर जास्तीत जास्त एक महिन्याच्या आत देण्याचे बंधन संबंधित अध्यक्ष तथा तहसिलदार व सदस्य सचिव तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची राहील. महिलांनी तक्रार अर्ज दाखल करण्यासाठी तालुकास्तरावर तहसिल कार्यालय व जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्याशी संपर्क करुन या उपक्रमाचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.




## इंदिरा गांधी राष्ट्रीय योजनेतील लाभार्थ्यांनी मोबाईल ॲपद्वारे हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ सेवा निवृत्ती योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा सेवा निवृत्ती चोजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग सेवा निवृत्ती योजनेतील लाभार्थी यांना आवाहन करण्यात येते की, केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत विशेष सहाय्य योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांसाठी एक नवीन सुविधा विकसित केली आहे. बेनिफिशरी सत्यपान ॲप या नावाने एक मोबाईल ॲप तयार करण्यात आले आहे. या पद्वारे लाभार्थ्यांचे हयातीचे प्रमाणपत्र म्हणजेच डिजिटल लाईफ सर्टिफिकेट ऑनलाईन तयार करता येणार आहे. या ॲपचा उपयोग करून, लाभार्थ्यांनी आपली हयात स्वतःच्या मोबाईलवरूनच सिद्ध करता येणार आहे. हे प्रमाणपत्र एनएसएपी पोर्टलवर थेट अपडेट होणार आहे. यामध्ये आधार प्रमाणीकरणाचा वापर करून प्रक्रिया पार पाडली जाते. प्रक्रिया आधार प्रमाणीकरणावर आधारित, सोप्या, सुरक्षित व पारदर्शक पद्धतीने पूर्ण होते.लाभार्थी स्वतः मोबाईलवरून, सहकारी, महा ई-सेवा केंद्र, तलाठी किंवा तहसील कार्यालयाच्या मदतीने ही प्रक्रिया करू शकतात. यासाठी गुगल प्ले स्टोअरवरून खालील दोन ॲप डाऊनलोड करावे. आधार फेस आरडी ॲप (adhaarFaceRd App) बेनिफिशरी सत्यपान ॲप (Beneficiary Satyapan App) बेनिफिशरी सत्यपान ॲप (Beneficiary Satyapan App) ओपन करा, भाषा निवडा. डिव्हाईस रजिस्ट्रेशन (Device Registration) करावे. आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि ई-मेल (ऐच्छिक) टाकणे. तसेच OTP टाकून रजिस्ट्रेशन पूर्ण करा. फेस ऑथेंटीकेशन (Face uthentication) करावे. मोबाईलचा कॅमेरा वापरून डोळ्यांची हालचाल करून सेल्फी घ्यावी. त्यानंतर बेनिफिशरी व्हेरिफिकेशन सर्टिफिकेट (Beneficiary Verification Certificate) मिळेल. सर्व लाभार्थ्यांनी आपल्या हयातीचे प्रमाणपत्र लवकरात लवकर बेनिफिशरी सत्यपान ॲप ('Beneficiary Satyapan App)' द्वारे ऑनलाईन तयार करून, शासनाच्या योजनांचा लाभ सुरू ठेवावा. असे तहसिलदार जाफ्राबाद व जालना यांनी कळविले आहे.

